# ‘अहंकाराचा वारा न लागो राजसा’

वय वर्षे ५८ पूर्ण. हे काही आत्मकथन लिहायचं वय नाही. तरीही आत्मकथनाचा घाट घातला, त्याचं कारण आयुष्यातील अनेक सुख दु:खाचे क्षण, सभोवतालच्या माणसांसोबतचे अविस्मरणीय प्रसंग मुठीतली वाळू सुटावी तसे सुटून जावू नयेत म्हणून, हे आत्मकथन वाचकांसमोर आणले आहे. महाराष्ट्रातील लोककला आणि लोककलावंतांचा सप्तरंगी इंद्रधनुष्या सारखा गोफ मी विणून घेतला स्वत:भोवती. ‘तुम्ही आम्ही एकमेळी गदारोळी आनंदे’ या अंतरिक उर्मीने या गोफाच्या रिंगणात मी ही नाचत राहिलो. आमच्या सय्याप्पा तातोबा बंडगर यांच्या धनगरी गजे ढोल नृत्यातल तो रंगी बेरंगी गोफ आजही आठवतोय. या गोफा सारखंच आठवतंय ते पंढरीच्या वारीतलं गोल रिंगण. या रिंगणात मी ही गळ्यात टाळ घालून नाचलो होतो. वाखरीच्या आगे मागे दिवसा वारी अन् रात्री बारी पंढरीच्या वाटेवर शेटफळच्या रस्त्यावर. समूहमनाचा प्रयोगात्म आविष्कार म्हणजेच लोककला. या समूहमनासोबत माझं आत्मभान विरलं होतं अनेकदा. नारायणगावच्या जत्रेतला विठाबाईच्या तमाशांचा फड अन पंढरीच्या यात्रेतला विठ्ठलरंगी रंगलेला कीर्तनाचा फड अशा शृंगार भक्तीच्या हिंदोळ्यावरचे अनेक अनुभव साठवले अत्तराच्या कुपी सारखे मनात. या अनुभवांचा दरवळ पुन्हा अनुभवावा अन् सांगीवांगी सुरू राहावी आपल्याशी म्हणून हा आत्मकथनाचा शब्दप्रपंच. विलक्षण अवहेलना अन् जेथे अवहेलना तसेच सन्मान असे अनेक योग जीवनात आले. धीर सुटावा असे बिकट प्रसंग आले अन् अभिमानाने माझी आणि माझ्या कुटुंबीयांची छाती फुलावी असे अनेक सुखाचे, आनंदाचे अनुभव आले. जेव्हा जेव्हा आयुष्यात उद्विग्नता आली, तेव्हा तेव्हा वडिलांकडे चार अश्रु ढाळले. वडिल म्हणाले ‘जनामाजी पिसे परी तो अंतरी शहाणा । सदा बह्मी जाणा निमग्न तो’....... ‘संकोचोनि काय झालासी लहान। घेई अपोषण ब्रम्हांडाचे’ ते काय सांगत होते. कोणाचं अभंग वचन सांगत होते ते कळण्याचं वय नव्हतं पण त्यांच्या रूपाने सारी संतपरंपरा मुखर होतेय असं वाटत होतं. पंढरीच्या विठ्ठल मुक्ती चळवळीचे प्रणेते हरि भक्त परायण रामदासबुवा मनसुख हे वारकरी महामंडळाचे अध्यक्ष होते त्यांचे आणि माझे आजोबा हरि भक्त परायण लक्ष्मणबुवा वाणी तसेच माझ्या वडिलांचे दृढ संबंध, किंबहुना ते आमच्या नात्यातलेच. ते म्हणायचे “‘सहाददादा’ तुमचा प्रकाश भंजाळलाय. एकीकडे कीर्तनाला येतो. आमच्या मुलाखती घेतो दुसरीकडे विठाबाईकडे जातो तिचा तमाशा पाहतो तिच्या तमाशावर लेख लिहितो !” त्यांची ही वाणी मला कधीच शीवी वाटली नाही. ओवी वाटली.

मुंबईत कामगार वस्तीत घोडपदेव डी.पी वाडी खोजा चाळीतल्या दहा बाय दहाच्या खुराड्यातला मी आज एखाद्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी अमेरिका, चीनला जातो तेव्हा विमानाच्या टेक ऑफच्या वेळी भोवळ यावी तशी भोवळ येते. अगदी अलीकडे डुनहाँगला एका अंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निघालो होतो. १२ ऑक्टोबर, २०१४ चा तो दिवस. चेग्डू विमानतळावर एका कॅफे हाऊसमध्ये बसलो असताना वंचना, उपेक्षा, अवहेलनांचे जुने दिवस आठवले अन् अस्वस्थ वाटू लागले. स्पेशल काउंटरवर जावून तातडीने वैद्यकीय उपचारांची मागणी केली. चिनी डॉक्टर म्हणाले “बीपी नॉर्मल ! ’ मग काय झालं असं? का

अस्वस्थ वाटलं." आयुष्यातले सुख दु:खांचे हिंदोळे इतके मोठे होते की त्यामुळेच असं घाबरल्या सारखं वाटतं असो ! या आत्मकथनाचा प्रपंच मांडताना माझाी सौभाग्यवती शैला माझी मुले डॉ.चेतन, सुखदा, सुनबाई डॉ. माधवी, जावई निखील खैरे माझी भावंडं समस्त खांडगे, वाणी कुटुंब लोकसाहित्य, लोककला क्षेत्रातील माझे गुरू, सहकारी आमच्या लोककला अकादमीतील सर्व सहकारी, माझ्यावर प्रेम करणारे महाराष्ट्रातील शेकडो लोककलावंत या सर्वांचा मी ऋणी आहे. आत्मकथन तुम्ही आम्हाला द्याच असा आग्रह करणारे डिंपल प्रकाशनचे अशोक मुळे अन् लेखक सुनील कर्णिक यांनी उमेद, उभारी दिल्यानेच आत्मकथन सिद्ध झाले. आत्मकथन शब्दांकीत करणाऱ्या नेहा किशोर सावंत यांची आणि माझी अशी छान गट्टी जमली की त्या म्हणायच्या "मीच प्रकाश खांडगे झाले" त्यांच्या परिश्रमांना आणि लेखन कल्पकतेला माझा सलाम! मी मुलखाचा आळशी केवळ अशोक मुळे आणि नेहा सावंत यांच्या पाठपुराव्यानेच आत्मकथन शक्य झाले कारण 'नोहे एकल्याचा खेळ । अवघा मेळविला मेळ' ही माझी धारणा आहे. काही चुकलो असल्यास मला क्षमा करा. 'अहंकारा वारा न लागो' हिच संत प्रेरित भूमिका !

**प्रा. डॉ. प्रकाश खांडगे**

**३०१, ३०२, पुनर्वसू, कोरस नक्षत्र, पोखरण रोड १,**
**वर्तक नगर, ठाणे (प) - ४०० ६०६**
**०२२-२५८८२२२३, भ्रमणध्वनी - ९८२१९१३६००**